# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 November 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यात विधानसभा निवडणुकीचा दिवस जवळ येत असल्यानं, सर्वच उमेदवारांनी प्रचाराचा वेग वाढवला
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वच उमेदवारांचा जनसंवादावर भर
- निवडणुकीत बंडखोरी करणारे १६ उमेदवार काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आजपासून चित्ररथाद्वारे मतदार जनजागृतीची मोहिम

आणि

- हिंगोली जिल्ह्यात गृह मतदानाला सुरुवात, पहिल्या दिवशी ७०० ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांचं मतदान

****

राज्यात विधानसभा निवडणुकीचा दिवस जवळ येत असल्यानं, सर्व प्रमुख पक्षांनी तसंच अपक्ष उमेदवारांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. सोबतच समाज माध्यमांचा देखील प्रभावी प्रचारासाठी उपयोग करण्यात येत आहे.

महाविकास आघाडी फक्त मतांचं राजकारण करते, ही आघाडी कोणतीही गॅरंटी पूर्ण करू शकत नाही, अशी टीका भाजपचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. बुलढाणा जिल्ह्यात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मलकापूर इथं आयोजित सभेला ते काल संबोधित करत होते. अमरावती जिल्ह्यात वरुड इथं देखील त्यांनी जाहीर सभेला संबोधित केलं. मोर्शी विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार देवेन्द्र भुयार आणि भाजपचे उमेश उर्फ चंदू

यावलकर यांच्यात मैत्रीपूर्ण लढत असली, तरी भाजपला मतदान करण्याचं आवाहन शाह यांनी केलं.

****

भाजप नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यवतमाळ जिल्ह्यात राळेगाव इथं भाजप उमेदवार अशोक उईके यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. जातीवादी आणि सांप्रदायिक प्रचारापासून दूर रहा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

काल सुटीच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी पदयात्रा, जनसंवाद आणि सभा घेण्यावर भर दिल्याचं दिसून आलं. औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी काल पदयात्रा काढली. याच मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार लहु शेवाळे यांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांची सभा झाली. औरंगाबाद मध्यचे महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी काल पदयात्रा काढून जनतेशी संवाद साधला. औरंगाबाद पश्चिम मतदार संघातले माहाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी देखील घरोघरी जाऊन नागरीकांशी संवाद साधला. एम आय एम पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी काल औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे उमेदवार इम्तियाज जलील यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ काल भव्य आशीर्वाद यात्रा पार पडली.

दरम्यान, धाराशिव मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत, धाराशिव आणि कळंब विधानसभा मतदारसंघासाठी आगामी काळात कृष्णा मराठवाडा सिंचन योजनेचं पाणी आणण्याला प्राधान्य देण्यात येईल, असं सांगितलं. यासोबतच त्यांनी मतदारसंघातल्या इतर प्रस्तावित कामांची माहिती देऊन, ती पूर्ण करण्याचं आश्वासन दिलं.

****

कळंब मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास पाटील यांनी काल कळंब तालुक्यात विविध ठिकाणी सभा घेत प्रचार केला. मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाच्या आरक्षण लढ्यात आपण विधानसभेत आणि रस्त्यावर देखील आवाज उठवणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, तुळजापूर शहरातल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी काल काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार कुलदीप पाटील यांनी या सर्वांचं पक्षात स्वागत केलं.

****

गंगापूर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सतिश चव्हाण यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची काल सभा झाली. पवार यांनी धाराशिव जिल्ह्यातल्या भूम – परंडा विधानसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारार्थ देखील सभा घेतली. राज्यात बळीराजा सुखी झाला पाहिजे, त्याच्या घरातली मुलं उच्चशिक्षित झाली पाहिजेत, त्यासाठी आम्ही काम हातात घेतलं असून, महाविकास आघाडीचे संघटन उभं केलं असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यानंतर त्यांची जालना जिल्ह्यात घनसावंगी इथं महाविकास आघाडीचे उमेदवार राजेश टोपे यांच्या प्रचारार्थ सभा झाली.
हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी इथं महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष टारफे यांच्या प्रचारार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा पार पडली.

****

विधानसभा निवडणुकीत बंडखोरी करणाऱ्या १६ उमेदवारांना काँग्रेस पक्षानं सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल यासंदर्भातलं पत्रक जारी केलं. महाविकास आघाडीच्या आणि काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारांविरोधात अर्ज दाखल करुन पक्ष शिस्तीचा भंग केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

****

मराठा समाजात संभ्रम नाही, लोकसभेला मराठा समाज एकत्र आला होता, आता विधानसभेलाही मराठा समाजाने, ज्याने आपल्या आरक्षणाला विरोध केला, त्याला पाडावं, असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे. ते काल जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलत होते. राजकारणापेक्षा आपण सर्वजण मिळून आपल्या आंदोलनाची तयारी करू, असं सांगून त्यांनी, पुढच्या वेळी सामूहिक उपोषण करणार असल्याचं सांगितलं.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणार्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी केलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज पुणे जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचं कर्तव्य करावं याकरता मतदान जनजागृतीचे कार्यक्रम राज्यात सर्वत्र होत आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सर्व विधानसभा मतदारसंघात आजपासून चित्ररथाद्वारे जनजागृतीची मोहिम राबवण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता हा चित्ररथ जिल्हाधिकारी कार्यालयातून रवाना होणार आहे.

जिल्ह्यातल्या गंगापूर – खुलताबाद मतदारसंघात मतदार जनजागृतीसाठी जनजागरण रॅली, संकल्प पत्र लेखन, रांगोळी, वक्तृत्व, निबंध स्पर्धा, पथनाट्य, प्रबोधनपर भारुड आणि लोकशाही दिंडी आदी उपक्रम राबवले जात आहेत. अनेक प्रबोधनात्मक गीतांमधून काल खुलताबाद, गंगापूर, जामगाव, वाळूज, रांजणगाव, शिल्लेगाव, लासूर स्टेशन इथं जनजागृती करण्यात आली.

नांदेड इथं मतदार जनजागृतीसाठी स्वीप अंतर्गत आज युवा मतदार मेळावा आणि पोलीस भरती मार्गदर्शन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात गृह मतदानाला सुरुवात झाली असून, काल पहिल्या दिवशी ७०० ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी मतदान केलं. गृह मतदानासाठी जिल्ह्यातून एक हजार ७० जणांनी नोंदणी केली आहे. सेनगाव तालुक्यातल्या हुळी इथं १०२ वर्षे वयाच्या आजोबांनी, तसंच ८७ वर्षीय पारूबाई पोले यांनी मतदानाचा हक्क बजावला.

****

बीड जिल्ह्यातल्या आष्टी विधानसभा मतदारसंघातल्या सहा उमेदवारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. या मतदारसंघात उमेदवारांच्या खर्चाच्या लेख्यांची पहिली तपासणी गेल्या शुक्रवारी झाली. त्यानुसार उमेदवार महेबुब इब्राहिम शेख,

प्रदीप चव्हाण यांना निवडणूक खर्चाचा हिशोब विलंबाच्या कारणांसह, तर सुरेश धस, बाळासाहेब आजबे, भिमराव धोंडे यांना लेख्यातील तफावतीसंदर्भात ४८ तासात खुलासा सादर करावा, अशा नोटिसा आष्टीच्या निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी बजावल्या आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी शासकीय सेवेतल्या एका अधिकाऱ्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्याचे आदेश देण्यात आले असून, दुसऱ्या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यास ताकीद दिली आहे. यासंदर्भात खुलताबादच्या कोहीनूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर अंभोरे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकर यांच्याविरोधात तक्रार प्राप्त झाल्यानंतर, आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सुनावणी घेतली. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

****

नांदेड पोलीस परीक्षेत्रात हातभट्टी निर्मूलनासाठी काल नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली या चारही जिल्ह्यात एकाच वेळी धाडी टाकण्यात आल्या. या कारवाईत २२ लाख ५९ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १६९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नांदेड पोलीस परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी ही माहिती दिली.

****

आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा उत्पादन शुल्क विभागानं गेल्या तीन दिवसात धडक कारवाया करुन आठ लाख १७ हजार ३० रुपयांच्या मुद्देमालासह अवैध दारु जप्त केली. जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया मुक्त आणि निर्भयपणे पार पडावी, यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास दक्ष राहण्याचे आणि आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आदेश दिले आहेत.

****

परभणी शहराजवळ वसमत महामार्गावरव दुचाकीला ट्रॅक्टरने धडक देऊन झालेल्या अपघातात पती-पत्नी आणि मुलाचा जागेवरच मृत्यू झाला. एकनाथ घुगे हे पत्नी शुभांगी आणि मुलगा समर्थ यांच्यासह परभणी इथून हिंगोली जिल्ह्यात औंढा

तालुक्यातल्या अंजनवाडी गावाकडे दुचाकीवर जात असताना विना नंबरच्या ट्रॅक्टर चालकाने भरधाव वेगात उलट दिशेने येऊन त्यांना धडक दिल्यानं हा अपघात झाला. मयत एकनाथ घुगे हे रिसोड बस डेपोत वाहक म्हणून कार्यरत होते.

****

दक्षिण आफ्रिकेनं दुसर्या टी – ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा तीन गडी राखून पराभव केला. काल गकेबरहा इथं झालेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकात सहा बाद १२४ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल दक्षिण आफ्रिकेच्या संघानं हे लक्ष्य १९व्या षटकात सात गडी गमावत पूर्ण केलं. चार सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत आहेत.

****